०२. **प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१– महादेव सुदाम ढाणे यांचा उर्वरित उलटतपास वादीचे सुविद्य विधिज्ञ श्री. एन. एल. बोरा यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत दाव्यात दाखल केलेला ग्रामपंचायत मिळकत उतारा हा मौजे तरडगाव येथील आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत ही मौजे सातेफळ येथील आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत दाव्यात दाखल केलेला उतारा व पावत्या यांचेवर गट क्रमांकाचा तसेच सर्वे क्रमांकाचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत गट क्रमांक १४६ पूर्वेला सोनेगाव खर्डा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीच्या दक्षिणेला गट क्रमांक १४२ आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत गट क्रमांक १४६ च्या पश्चिमेला गट क्रमांक १४५ व उत्तरेला गट क्रमांक १४७ आहे. हे म्हणणे खरे नाही की, खैरी कॅनल हा नेमक्या कोणत्या गटामधून गेलेला आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकती मध्ये आमचे क्षेत्र सोडून दशरथ ढाणे यांचे ५९ आर, ज्योतीराम ढाणे ३० आर, पोपट ढाणे २९ आर, दतात्रय ढाणे ४४ आर आणि सुनिता ढाणे १६ आर यांचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक १४६ मधील सर्व कब्जेदारांच्या वहिवाटी हया स्वतंत्र असून ते त्यांच्या त्यांच्या जमीनीतून वहिवाट घेतात. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक १४६ मधील कब्जेधारकांचे क्षेत्र हे खुना करुन दाखवलेले आहे.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीच्या पूर्वेला सोनेगाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीच्या उत्तर बाजूस माझे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीच्या दक्षिणेला प्रतिवादी क्रमांक ०५ दतात्रय यांचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीच्या पश्चिमेला खैरी कॅनल आहे. सुनिता पोपट ढाणे यांचे क्षेत्र माझ्या वाटणीच्या लगत आहे.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उताऱ्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे क्षेत्र माझ्या ताब्यात आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, ५० आर इतके क्षेत्र हे माझ्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या ताब्यात असलेले जास्तीचे क्षेत्र दाखविण्याकरीता माझ्याकडे कोणताही

कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये खरेदीखतापासून वादीचा ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या त्याच्या क्षेत्रामध्ये १४ पत्रयाचे शेड केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीच्या क्षेत्रावरुन व हददीवरुन वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, उतार्‍याप्रमाणे, वहिवाटीप्रमाणे मोजणी झाल्यास तो वाद मिटेल.

**१२.** दिनांक ०१/१०/२०१७ रोजी मी हनुमंत यांना हरकत अडथळा केला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर वादीने आम्हाला वाद मिळकतीची मोजणी करुन खुणा कायम करुन मोजणी करुन घेवू असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला वाद मिळकतीमध्ये त्याच्या शांततामय कब्जेवहिवाटीमध्ये हरकत अडथळा करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेल्या हरकत अडथळयामुळे वादींना वाद मिळकतीमध्ये वहिवाट करता येत नाही.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, वर्षात दोन वेळा तलाठी जमीनीची पाहणी करण्याकरीता येतो. हे म्हणणे खरे नाही की, तलाठी हे पिक पाहणी करण्याकरीता येतात. हे म्हणणे खरे नाही की, तलाठी शेत जमीनीची पाहणी करतात व ज्यांच्या कब्जयामध्ये शेतजमीनी आहे त्या कब्जेधारकांची नावे नमुद करतात. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ पासून ते आजतागायतचे मी वाद मिळकतीचे ७/१२ उतारे पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ पासून ते आजतागायत ७/१२ उतार्‍यावर खुदद म्हणून वादीच्या नावाची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आजतागायत तहसिल कार्यालयात सदर नोंदीबाबत हरकत घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीमध्ये तळयाच्या पाईपलाईनने पाणी येते.

**१४.** दिनांक २२/०२/२००० साली झालेल्या खरेदीखतामध्ये बांधकाम क्षेत्राचा उल्लेख नाही किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्रमांक १९ मधील मजकूर ''मला शासना मार्फत सन २००७ मध्ये घरकुल मंजूर झाले व त्यानुसार मी घरकुलाचे बांधकाम करुन तेथे कुटूंबासह राहत होतो व आजही तेथेच राहत आहे'' हा मजकूर खोटा आहे.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्रमांक २४ मधील मजकूर ''सदरचे खरेदीखत हे गहाणमुक्त केले आहे व त्यावेळी रक्कम कमी पडली म्हणून १० हजार रुपये वादीच्या वडीलांकडून घेतले '' हा मजकूर खोटा आहे.

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, गहाणाच्या व्यवहाराला व्याज दर असतो. माझ्या आईने वादीच्या वडीलांकडून उसणवार रक्कम घेतले होते हे दशविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मलिकार्जून जनकावळे व दत्तु विठोबा कुटे यांच्याशी माझे वैमनस्य नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २२/०२/२००० रोजीच्या खरेदीखतान्वये वादीला त्यांचे क्षेत्र मिळाले व तेव्हापासून आजतागायत ते वाद मिळकतीची वहिवाट करतात. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत प्रकरणामध्ये माझा जो बचाव घेतलेला आहे तो खोटा असून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

११. <u>उलटतपास पूर्ण,</u>

१२. <u>फेरतपास नाही.</u>

१३.

१४. श्रवणोत्तर स्वीकृती,

१५. समक्ष,

१६.

१७.

१८. सही/-

२१. **(अनुश्री ब. फंड)**

१९. दिनांक:- २७/०२/२०२६

२०. ठिकाण:- जामखेड

२२. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

२३. जामखेड.

२४.

२५. (साक्षीदाराचा जबाब त्याने सांगितल्याप्रमाणे नोंदविला)